**साक्षीदार क्र.९**
चीसाक्ष शपथेवर सुरु

नि.फौ.प्र.क्र ४०/२००९
सरकार ..वि.. गजानन+१
**नि.क्र. ९८**

**नाव** – प्रकाशराव महादेवराव सव्वालाखे,
वय – ६७ वर्षे, कामधंदा –सेवानिवृत्त्,
रा. परतवाडा, ता. अचलपुर, जि. अमरावती

**सरतपासणी करीता सरकारतर्फे सहा. सरकारी वकील कु. आर. एस. श्रीराव यांच्या मार्फत**

**१.** मी सन– २००७ ते २००८ च्या सुमारास मध्ये खैरी, ता. अचलपुर, जि. अमरावती येथे तलाठी पदावर कार्यरत होतो. त्या काळामध्ये मला नायब तहसिलदार यांचा आदेश प्राप्त झाला होता. त्यानुसार त्यांनी मला फेरफार घेण्याबाबत आदेशीत केले होते. त्यांनी मला नावामध्ये दुरुस्ती करण्याबाबत फेरफार घेण्याबाबत आदेशीत केले होते. आता मला नि.क्र. ५६ वरील आदेश दाखविण्यात आला. हा तोच आहे. ज्यानुसार मला कार्यवाही करण्यास सांगितले होते. सदर आदेशानुसार मी फेरफार नोंदविला होता. त्याप्रमाणे फेरफार क्र. २७३ नोंदविण्यात आला होता.

**आरोपीतर्फे उलटतपास : श्री. पाटील वकील यांच्यामार्फत**

२. मौजा– खैरी हे गाव येसुर्णा महसुल सर्कलमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सन–२००७–०८ च्या सुमारास असदपुर सर्कलमध्ये कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मला येसुर्णा सर्कलमध्ये काम करण्यासाठी मला तहसिलदार किंवा उपविभागीय अधिकारी यांचे आदेश दिल्या गेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ गाव नमुना –अ मध्ये उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशा शिवाय बदल करता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला फेरफार बदल करण्याबाबत उपविभागीय अधिकारी यांनी आदेश दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे

येसुर्णा सर्कलमध्ये काम करण्याचे अधिकार नव्हते त्यामुळे मी आज रोजी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला, फेरतपास काही नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.                समक्ष,

**(जी. बी. नंदागवळे)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.२, चांदूर बाजार

**दिनांक – २८.०६.२०२४**